# अनुकंपा नियुक्तीसाठी विविध संवर्गातील पदांची शैक्षणिक अर्हता

| अ.क्र | सेवा व संवर्ग | पद | नेमणूकीची अर्हता |
|---|---|---|---|
| 1 | जिल्हा सेवा ( वर्ग तीन) तृतीय श्रेणी | विस्तार अधिकारी (कृषी) | ज्यांनी मान्यताप्राप्त विद्यापीठाची कृषि विषयातील पदवी किंवा इतर कोणतीही समतुल्य अर्हता धारण केली असेल अशा उमेदवारांची नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल, परंतु कृषि विषयातील उच्च शैक्षणिक अर्हता आणि कृषि विषयक कामाचा अनुभव किंवा कृषि पद्धतीचे व्यावसायाचे ज्ञान व ग्रामीण जीवनाचा अनुभव असेल अशा उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| 2 | जिल्हा सेवा ( वर्ग- 3) सांख्यिकी व्दितीय श्रेणी | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | संविधानिक विद्यापीठाची विज्ञान, कृषी, वाणिज्य किंवा वाड:मय शाखेची अर्थशास्त्र किंवा गणित अथवा सांख्यिकी विषयासह प्रथम अगर व्दितीय वर्गातील पदवी धारण करत असतील किंवा ज्यांना नमुना सर्वेक्षण करण्याचा अनुभव असेल, किंवा पदवी व अनुभव दोन्ही असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल, परंतु, उक्त विषयांपैकी एका विषयाची स्नातकोत्तर पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. |
| 3 | जिल्हा सेवा ( वर्ग- 3) वर्गीय | वरिष्ठ सहाय्यक (लिपीक) | संविधानिक विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल |
| 4 | जिल्हा सेवा ( वर्ग- 4) | परिचर | नेमणूक एक तर - (ब) मान्यता प्राप्त कोणत्याही प्राथमिक शाळेची कमीत कमी इयत्ता चौथी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे करण्यात येईल. ( परंतु आणखी असे की ) शासननिर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही 1076 दि. 23 एप्रिल 1976 मध्ये नमूद केलेप्रमाणे आणि त्यानंतर वेळोवेळी शासनाने तत्संबंधी दिलेल्या कोणत्याही उत्तरवर्ती आदेशानुसार सेवेत असताना निधन झालेल्या किंवा क्षय, कर्करोग इ. कर्मचाऱ्यांच्या जवळच्या नातेवाईकांस जर कोणत्याही मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेची कमीत कमी इयत्ता चौथी उत्तीर्ण असल्यास अनुकंपा म्हणून नामनिर्देशनाने प्राथम्याने नेमणूक करण्यात येईल. ( आणखी असे की ) शासननिर्णय ग्रामविकास विभाग क्र. एव्हीटी - 2479 / 16307/ 3195/ 4, दि.11 सप्टेंबर 1980 यात अंतर्भूत असलेल्या आदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परिचर या पदावर केलेल्या नेमणूकीवर या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही. |
| 5 | जिल्हा सेवा ( वर्ग- 3) | ग्रामसेवक | उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान 60 % गुणांसह उत्तीर्ण किंवा शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका ( तीन वर्षाचा अभ्यासक्रम), किंवा शासनमान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी ( बी.एस.डब्ल्यू.) किंवा माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तुल्य अर्हता आणि कृषी विषयाची पदविका दोन वर्षाचा अभ्यासक्रम धारण करत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल मात्र कृषी विषयाची पदवी किंवा उच्च अर्हता धारण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | करणाऱ्या किंवा समाजसेवेचा अनुभव आणि ग्रामीण अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल आणि संगणक हाताळणी / वापराबाबत माहिती तंत्रज्ञान, संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झालेचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. |
| 6 | जिल्हा सेवा ( वर्ग- 3) | आरोग्य पर्यवेक्षक | ज्यांनी मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी धारण केलेली असेल आणि ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा 12 महिन्यांचा पाठ्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला असेल अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. |
| 7 | जिल्हा सेवा ( वर्ग- 3) | आरोग्य सेवक महिला ( ए.एन.एम.) | ज्यांची अर्हताप्राप्त सहाय्यकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील |
| 8 | जिल्हा सेवा ( वर्ग- 3) | औषध निर्माण अधिकारी ( मिश्रक) | औषध निर्माण शास्त्रातील पदवी किंवा पदविका धारण करणारे आणि औषधशास्त्र अधिनियम 1948 खालील नोंदणीकृत औषध निर्माते असलेले उमेदवार |
| 9 | जिल्हा सेवा ( वर्ग- 3) | आरोग्य सेवक (पु.) 50% | विज्ञान विषय घेऊन माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार, राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणून 90 दिवसाचा फवारणी कामाचा अनुभव आवश्यक<br><br>ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा 12 महिन्याचा मुलभूत पाठ्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला नसेल अशा उमेदवारांनी नियुक्ती नंतर असे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील. |
| 10 | जिल्हा सेवा ( वर्ग- 3) | आरोग्य सेवक (पु.) 40% | विज्ञान विषय घेऊन माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार, ज्यांनी बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असणारा 12 महिन्याचा मुलभूत पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला नसेल अशा उमेदवारांनी नियुक्ती नंतर असे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील. |
| 11 | जिल्हा सेवा ( वर्ग- 3) | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | मान्यताप्राप्त विद्यापीठाचे भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व जीवशास्त्र वा वनस्पतीशास्त्र अथवा प्राणीशास्त्र किंवा सुक्ष्मजीवशास्त्र यासह सामान्य विज्ञान विषयाची पदवी असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल ( परंतु हाफकिन संस्थेचे वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्र शास्त्रामध्ये पदविका धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. ) |
| 12 | जिल्हा तांत्रिक सेवा ( वर्ग- 3) (अभियांत्रिकी) प्रथम | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा किंवा तुल्य परिक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा एक वर्षाचा पाठ्यक्रम परिक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार संविधीमान्य तत्सम खालील पाठ्यक्रम 1) स्थापत्य अभियांत्रिकी या एक |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्रेणी | | वर्षाचा पाठ्यक्रम उत्तीर्ण किंवा 2) आर्किटेक्चरल ड्राफ्टसमन (वास्तुशास्त्र आरेखक) किंवा 3) कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक) किंवा 4)आरेखक (स्थापत्य) हा दोन वर्षाचा पाठ्यक्रम उत्तीर्ण किंवा 5) सैनिकी सेवेतील बांधकाम पर्यवेक्षकाचे अनुभव प्रमाणपत्र किंवा स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी धारण करीत असतील असे उमेदवार |
| 13 | जिल्हा सेवा वर्ग-3 ( दुय्यम अभियांत्रिकी ) प्रथम श्रेणी | कनिष्ठ अभियंता स्थापत्य | स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठयक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करीत असतील असे उमेदवार |
| 14 | जिल्हा सेवा वर्ग-3 ( दुय्यम अभियांत्रिकी ) प्रथम श्रेणी | कनिष्ठ अभियंता यांत्रिकी | यांत्रिकी अभियांत्रिकी या विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठयक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करीत असतील असे उमेदवार |
| 15 | जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग- 3), दुय्यम पशुसंवर्धन , प्रथम श्रेणी | पशुधन पर्यवेक्षक | ( दोन ) ( अ ) संविधीक विद्यापीठाची, पशुवैद्यकीय शास्त्रातील पदवी धारण करीत असलेल्या व्यक्ती किंवा<br><br>( ब ) पशुधन पर्यवेक्षक, पशुपाल, पशुधन सहाय्यक, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी किंवा पशुधन विकास अधिकारी ( ब ) श्रेणी याबाबतची पशुसंवर्धन संचालनालयाने दिलेली पुढील पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्ती 1)त्यावेळच्या मुंबई राज्याने चालविलेल्या अभ्यासक्रमासह, पशुवैद्यक पशुपाल प्रशिक्षक अभ्यासक्रम<br><br>2) पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आणि राज्यातील विविध संविधीक कृषी विद्यापीठे यांनी चालवलेल्या पशुधन पर्यवेक्षक अभ्यासक्रम<br><br>3) पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन यांनी चालविलेला पशुवैद्यक व पशुसंवर्धन शास्त्रातील दोन वर्षाचा सेवांतर्गत पदविका अभ्यासक्रम, आणि,<br><br>4) खालील संस्थांनी चालवलेला पशुवैद्यक शास्त्र विषयासह दुग्धशाळा व क्षेत्र व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका यामधील दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम (एक) महाराष्ट्र तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, किंवा<br><br>(दोन) राज्यातील विविध संवेधीक कृषी विद्यापीठ किंवा<br><br>(ब) ज्यामुळे नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायिकाच्या पर्यवेक्षणाखाली व निर्देशनाखाली किरकोळ पशुवैद्यकीय सेवा करण्याचा हक्क असेल अशी, भारतातील कोणत्याही पशुवैद्यक संस्थेची पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्ती, परंतु किरकोळ वैद्यकीय सेवा करण्याचा त्यांना हक्क मिळवून देणाऱ्या पदविकेचा किंवा प्रमाणपत्राचा धारक भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम 1984 (1984 चा 52 याच्या कलम 30 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | च्या खंड (ख) च्या परंतुकातील स्पष्टीकरणान्वये व कलम 57 अन्वये कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभागाने महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात काढलेल्या क्रमांक आयव्हीसी 1006/ प्र.क्र 532/ पदुम - 4 दिनांक 27 ऑगस्ट 2009 च्या अधिसूचनेद्वारे विर्निदिष्ट केलेल्या किरकोळ पशुवैद्यकीय सेवा देण्यास हक्कदार असेल, आणि (तीन) माहिती तंत्रज्ञान संचलनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून वेळोवेळी विहित केलेले संगणक वापराबाबतचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. |
| 16 | जिल्हा तांत्रिक सेवा-वर्ग-3 , समाजकल्याण (चार) पर्यवेक्षिका ( एकात्मिक बाल विकास सेवा) | पर्यवेक्षिका | ज्या महिला उमेदवारांनी एखाद्या संविधीक विद्यापीठांची, खास करुन समाजशास्त्र किंवा गृह विज्ञान किंवा शिक्षण किंवा बालविकास किंवा पोषण किंवा समाजशास्त्र या विषयातील स्नातक ही पदवी धारण केलेली आहे. तसेच महिला व बालविकास विभागागकडील शासन अधिसुचना दि. 04 जुन 2021 नुसार ज्यांनी पदवी धारण केली असेल असे उमेदवार. |
| 17 | 1.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा सेवाप्रवेश नियम 1967 मधील परिशिष्ठ 4 चा नियम 9 शासन निर्णय क्र.पीआरई 1098/1945/प्राशि-1 दि.10 मार्च, 2000 शिक्षण सेवक योजना सुरु<br><br>2.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण - 2015 -/ प्र.क्र.303/टिएनटी-1 दि.20 जानेवारी 2016 | वर्ग - 3 प्राथमिक शिक्षक / शिक्षण सेवक | महाराष्ट्र शासन निर्णय क्र. पीआरई-2002/3395/प्रशि-1 दि.27 फेब्रुवारी 20003 अन्वये जोडपत्र अ मधील मुद्दा क्र. 8 नुसार शिक्षण सेवकांसाठी वयोमर्यादा 18 वर्षे व कमाल वयोमर्यादा 30 वर्षे व मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा 35 वर्षे राहील. शासन वेळोवेळी शासन निर्णयाव्दारे विहीत करील अशी वयोमर्यादा शिक्षण सेवकांना आपोआपच लागू होईल . तसेच जोडपत्र अ मधील मुद्दा क्र.3 नुसार शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती करावयाच्या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता एस.एस.सी/एच.एस.सी.( अध्यापन पदविका उत्तीर्ण ) अशी राहील. तसेच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण -2015/प्र.क्र.303 /टीएनटी -1 दि.20 जानेवारी , 2016 च्या नियम क्र. 3 नुसार सदर पदावर अनुकंपा तत्वाने शिक्षण सेवक म्हणून नियुक्ती देताना संबंधित अनुकंपाधारक हा शिक्षण सेवक पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करणारा असावा. तसेच ग्रामविकास विभागाकडील पत्र क्र. अकंपा-2021/प.क्र..248/आस्था-7 दि. 11/10/2022 अन्वये प्राथमिक शिक्षक पदासाठी TET उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. |
| 18 | जिल्हा सेवा ( वर्ग तीन) | कनिष्ठ लेखाधिकारी | ज्यांनी मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी धारण केली असेल व कोणत्याही सरकारी कार्यालय व्यापारी भागीदार संस्था अथवा स्थानिक प्राधिकरण यातील किमान 5 वर्षाचा अखंड सेवेचा ज्यांना अनुभव असेल अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यात येईल. याबाबतीत लेखाशास्त्र आणि लेखापरिक्षा हे विशेष विषय |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणाऱ्यांना अथवा प्रथम वा व्दितीय वर्गातील पदवी धारण करणाऱ्यांना आधिक पसंती दिली जाईल किंवा गणित अथवा सांख्यिकी अथवा लेखाशास्त्र व लेखा परीक्षा हे प्रमुख विषय घेऊन पदव्युत्तर पदवी धारण करत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यात येईल. याबाबतीत कोणत्याही सरकारी कार्यालयातील अथवा व्यापारी संस्थेतील अथवा स्थानिक प्राधिकरणातील लेखा कार्याचा अनुभव असणाऱ्यास अधिक पंसती देण्यात येईल. |
| 19 | जिल्हा सेवा ( वर्ग तीन) तृतीय श्रेणी | कनिष्ठ सहाय्यक ( लिपीक) | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परी क्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचाऱ्यांनी मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी अनुक्रमे मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे दर मिनीटास 30 शब्द या गतीन दिलेले प्रमाणपत्र धारण करत असतील किंवा टंकलेखनामध्ये 50 % गुण मिळवून माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा तुल्य अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाले असतील असे उमेदवार परंतु उक्त दोन्ही भाषांपैकी कोणत्याही भाषेतील गतीच्या प्रमाणपत्रानुसार नियुक्त केलेले उमेदवार, नियुक्त केलेल्या तारखेपासून 2 वर्षाच्या कालावधीत दुसऱ्या भाषेतील दर मिनीटास 40 शब्दाहून कमी नाही अशा टंकलेखनाच्या गतीचे प्रमाणपत्र मिळवतील असे उमेदवार |
| 20 | जिल्हा सेवा (वर्ग तीन) तृतीय श्रेणी | कनिष्ठ सहाय्यक (लेखा) | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार तसेच महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचाऱ्यांसाठी मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकीय परीक्षा विभाग, शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य यांनी मराठी टंकलेखनाचे दर मिनीटास 30 शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असतील किंवा टंकलेखनामध्ये 50 टक्के गुण मिळवुन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अथवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.<br><br>परंतु, असे की, इंग्रजी विषय घेऊन माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या किंवा इतर भाषेतील टंकलेखनाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल.<br><br>तसेच लेखाविषयक कामकाजाचा पूर्वानुभव असलेल्या उमदवारांना अधिक पसंती दिली जाईल. |
| 21 | जिल्हा सेवा (वर्ग तीन) तृतीय श्रेणी | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील याबाबत लेखा शाखा व लेखा परिक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणाऱ्या अथवा पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गातील पदवी धारण करणाऱ्या अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारी संस्थेत अथवा स्थानिक प्राधिकरणात तीन वर्षाहुन कमी नसेल इतक्या अखंड कालावधी पर्यंत लेखा विषयक कामांचा पदवी नंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल. |



सही xxx
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा प्र.)
सातारा जिल्हा परिषद